# बीडमध्ये आणखी एका दरोडेखोर टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २०७ ■ मंगळवार दि.१५ एप्रिल २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 207 ■ Tuesday Dt.15 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4





# अवादा कंपनीतील प्रकल्पावरील चोरीनंतर कारवाईचा धडाका

## सुरक्षा रक्षकांचे हात-पाय बांधून १३ लाख रुपयांचे कॉपर वायर व इतर साहित्याची झाली होती चोरी

- ■ चोरी करणाऱ्या १४ जणांच्या टोळीपैकी १० जणांची ओळख; यातील चौघांना अटक
- ■ या टोळीने आतापर्यंत चोरी, दरोडे, माराहाणी, वाटमारी अशा प्रकारचे २७ गंभीर गुन्हे केल्याची पोलीस डायरीत नोंद?
- ■ पवनचक्की प्रकल्पांवरुन कॉपर वायर चोरीची ही चौथी घटना; आरोपींकडून ११ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त?
- ■ वाल्मीक कराडने याच कंपनीच्या व्यवस्थापकाकडे दोन कोटी रुपयांची खंडणीची केली होती मागणी?
- ■ खंडणीला अडसर ठरल्याने संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आल्याने ही अवादा कंपनी चर्चेत!

बीड । प्रतिनिधी



संतोष देशमुख हत्या प्रकरणातील वाल्मीक कराड गँग, बीडमधील आठवले गँग आणि आष्टी तालुक्यातील खुन प्रकरणातील टोळीवर मकोका नुसार गुन्हा नोंद केल्यानंतर आणखी आता एका दरोडेखोरांच्या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. विडा (ता. केज) येथील अवादा कंपनीच्या उभारणी सुरु असलेल्या पवनचक्कीवरुन ता. सात एप्रिल रोजी सुरक्षा रक्षक अभिजित दुनघव व आकाश जाधव यांचे हात - पाय बांधून १३ लाख रुपयांचे कॉपर वायर व इतर साहित्याची चोरी झाली होती.

चोरी करणाऱ्या १४ जणांच्या टोळीपैकी १० जणांची ओळख पटविण्यात आली असून यातील चौघांना अटक करण्यात आली. या चोरट्यांचा यापूर्वीही पवनचक्की प्रकल्पांवरुन साहित्य चोरीचा इतिहास आहे. बोरखेड (ता. बीड) येथील विज रोहित्र चोरी प्रकरणी नेकनूर, मस्साजोग प्रकल्पावरील कॉपर वायर चोरी प्रकरणी केज व पाटोदा पोलिस ठाण्यातही असाच गुन्हा नोंद असल्याचे समोर आल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले.



या टोळीने पवनचक्की प्रकल्पांवरुन कॉपर वायर चोरीची ही चौथी घटना आहे. आरोपींकडून ११ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. (झेश्रळलश) बबन सरदार शिंदे (वय ४०, रा. नांदूर, ता. केज), धनाजी रावजी काळे (वय २३, रा. वाशी, जि. धाराशिव), मोहन हरी काळे (वय ३०, रा. वाशी, जि. धाराशिव) व लालासाहेब सखाराम पवार (वय २६, रा. दसमेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) अशी स्थानिक गुन्हा शाखेने अटक केलेल्यांची नावे आहेत. चौदा जणांच्या टोळीने चोरी केली. यापैकी १० जणांची ओळख पटल्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत म्हणाले.

### संतोष देशमुख हत्येमुळे कंपनी चर्चेत!

वाल्मीक कराडने याच कंपनीच्या व्यवस्थापकाकडे दोन कोटी रुपयांची खंडणी मागीतली. त्यावरुन त्याचा साथीदार सुदर्शन घुलेने या ठिकाणी भांडणही केले. खंडणीला अडसर ठरल्याने संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आल्याने ही कंपनी चर्चेत आलेली आहे. दरम्यान, पवनचक्की कंपन्यांना सेफ्टी ऑडीटच्या सुचना दिल्या आहेत. सुरक्षा रक्षकांचे चारित्र पडताळणी, प्रकल्पांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. विडा येथील पवनचक्कीवरील सीसीटीव्ही बंद होते, असेही त्यांनी नमूद केले. या टोळीने आतापर्यंत चोरी, दरोडे, माराहाणी, वाटमारी अशा प्रकारचे २७ गंभीर गुन्हे केल्याची नोंद पोलिस डायरीत आहे. सर्वाधिक गुन्हे धाराशिव जिल्हा हद्दीतील आहेत. चौघांना अटक केली असून मकोका नुसार कारवाई प्रस्तावित करण्यात आली, असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी सांगितले.



## खुनाच्या घटनेने बीड जिल्हा पुन्हा हादरा! जिल्ह्यातील खुनाचे सत्र काही थांबायचं नाव घेत नाही..!

# माजलगाव तालुक्यात भाजप नेत्याची भरदुपारी धारधार कोयत्याने निर्घृण हत्या!

- ■ या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ!
- ■ आरोपी पोलिसांच्या ताब्यात हत्येचे कारण मात्र अद्याप अस्पष्ट; बीड पोलिसांकडून कसून तपास सुरू?

माजलगाव । प्रतिनिधी

भाजप लोकसभा विस्तारकाची माजलगाव मध्ये धारधार कोयत्याने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बाबासाहेब आगे असे भाजप पदाधिकाऱ्याचे नाव आहे. माजलगावच्या कीट्टी आडगाव येथे बाबासाहेब आगे यांची धारधार कोयत्याने हत्या करण्यात आली. माजलगाव शहरात भरदिवसा भाजप पदाधिकारी बाबासाहेब आगे यांची धारदार शस्त्राने वार करत हत्या करण्यात आली. बाबासाहेब आगे हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेतील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

धारदार शस्त्राने वार केल्याने बाबासाहेब आगे यांचा जागीच मृत्यू झाला. आज दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही माजलगाव मध्ये घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बाबासाहेब आगे यांची हत्या नेमकी हत्या कोणी आणि कोणत्या कारणाने केली? याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नही. पोलिसांकडून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बीड जिल्ह्यातील खुणाचे सत्र काही थांबायचं नाव घेत नाही. माजलगाव मध्ये बाबासाहेब आगे यांची हत्या करण्यात आली. बाबासाहेब आगे हे भाजप लोकसभा विस्तारक म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी होती. आगे यांच्या हत्येची घटना घडल्यानंतर पोलीस घटनास्थळावर दाखल झाले. याप्रकरणी आरोपी नारायण फपाळ याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हत्त्याचं कारण मात्र अद्याप अस्पष्ट आहे. बीड पोलिसांकडून कसून तपास केला जातोय.



# परळीत किरीट सोमय्यांना दाखवले काळे झेंडे

परळी । प्रतिनिधी

बांगलादेशी घुसखोर या नावाच्या आडून परळीसह जिल्हाभरातील मुस्लिम समाजाला टार्गेट करणाऱ्या किरीट सोमय्या यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी करत संतप्त जमावाने भाजप नेते किरीट सोमय्या यांना काळे झेंडे दाखवल्याचा प्रकार आज सकाळी येथील एक मिनार चौकात घडला. यावेळी संतप्त युवकांनी किरीट सोमय्या यांच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केली.

परळी येथील सकल मुस्लिम समाजाच्यावतीने आज परळी दौऱ्यावर असलेले भाजप नेते किरीट सोमय्या यांना काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात आला. यावेळी जमावातील काही युवकांनी सोमय्या यांचा ताफा देखील अडवण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर किरीट सोमय्या यांच्या निषेधार्थ घोषणाबाजी करत सोमय्या चले जाब असे नारे देखील दिली. याबाबत परळी तहसिलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील सर्व जाती-धर्मातील लोक गुण्यागोविंदाने राहतात. जिल्ह्यातील भाईचारा कायम असून भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यासारखे बाहेरचे लोक येवून जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करत आहेत. जिल्हा प्रशासनाने विलंबाने दिलेले जन्म प्रमाणपत्र बोगस असून, बांगलादेशी घुसखोरांना हे प्रमाणपत्र दिल्याचा आरोप सोमय्या यांनी केल्यानंतर मुस्लिम समाजातून संताप व्यक्त होवू लागला आहे. सरसगट सर्वांना बांगलादेशी घुसखोर म्हणून सोमव्या यांनी मुस्लिम समाजाच्या देशभक्तीवर आणि भूमिकेवर संशय घेत अवमान केल्याने त्यांना जिल्ह्यात येण्यापासून रोखावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. त्याचबरोबर परळीत जेवढे काही जन्मप्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यांना कायम ठेवावे अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# महाराणी ताराबाईंच्या विद्यार्थ्यांना ८ लाख ४० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार : आंधळे

## शालेय समितीचे अध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या १४ विद्यार्थ्यांचा सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १४ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील इयत्ता-८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एनएमएमएस २०२४-२५ शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून पात्र झाले आहेत त्यांचा पालकासह विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष मा.श्री. संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते गुणगौरव करण्यासाठी सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते मा.संजयभाऊ आंधळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी., उपप्राचार्य मस्के ए.आर., पर्यवेक्षक धाईतिडक सर, अर्थ विभाग प्रमुख श्री.डोईफोडे सर, प्रमुख वक्त्या म्हणून श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,



श्री.कुलकर्णी सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या कु.रेडेकर प्रांजल, कु.बोंगार्डे वेदिका, कु. दिवटे संस्कृती, चि.बारटक्के सुमित, चि.गुरसाळी गौरव,चि. मुंडे गोरख, चि.रोकडे कुणाल, चि.घुमरे श्रीराज, कु.झाडे श्रावणी, कु.वरवडे जान्हवी, चि.बोंगार्डे सौजन्य, कु.चौरे अक्षरा, चि.उजगरे कार्तिक, कु.कप्पे हर्षदा या १४ गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह बुक देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या १४ विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षाच्या शिक्षणासाठी आठ लक्ष चाळीस हजार (८४०,०००) रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. एनएमएमएस परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विभाग प्रमुख चव्हाण बी.बी., श्री.चांदणे सर, श्री.राऊत एम.बी., श्री.गिलबिले सर, श्री.मुंडे ए.बी., श्री.डमरे सर, श्रीमती मंत्रे मॅडम यांचे मा.संजयभाऊ आंधळे तसेच प्राचार्य राऊत डी.डी., उपप्राचार्य मस्के सर यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर, श्री.डोईफोडे सर, प्रमुख वक्त्या श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने विचार व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले त्यानंतर अध्यक्ष समारोपर विचार व्यक्त करताना मा.संजयभाऊ आंधळे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे भारत देश आज एक संघ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून त्यांनी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या तसेच एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या सर्व विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी. यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## विद्याभारती आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय संशोधन जनरलमध्ये मोहित खैरनार यांचा रिसर्च पेपर प्रसिद्ध

पुणे । प्रतिनिधी





येथील जेएसपीएमच्या जयवंत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमधील एमबीएचे विद्यार्थी मोहित खैरनार यांनी ३-४ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या उद्योजकता आणि नवोपक्रमावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत महत्त्वपूर्ण शैक्षणिक योगदान दिले. पुणे येथील पीसीएमसीमधील व्यवसाय आणि व्यक्तींमध्ये पारंपारिक पेमेंट पद्धतींपेक्षा डिजिटल पेमेंट पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास या शीर्षकाच्या त्यांच्या संशोधन पत्राने भारताच्या वेगाने विकसित होत असलेल्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा वेळेवर शोध घेतल्याबद्दल लक्ष वेधले.

प्रा. शामसुंदर मालगीकर यांच्या तज्ञ मार्गदर्शनाखाली, हा अभ्यास महाराष्ट्रातील गजबजलेले अर्ध-शहरी केंद्र असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) प्रदेशातील व्यक्ती आणि व्यवसायांच्या बदलत्या आर्थिक प्राधान्यांचा खोलवर अभ्यास करतो.

या अभ्यासात डिजिटल पेमेंट दत्तक ट्रेंडमध्ये मौल्यवान अंतर्दृष्टी देण्यात आली, विशेषतः तरुण आणि उच्च उत्पन्न मिळवणाऱ्यांमध्ये, तसेच वृद्ध आणि ग्रामीण लोकसंख्येवर परिणाम करणाऱ्या डिजिटल दरीवरही भर देण्यात आला. सायबरसुरक्षा पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, डिजिटल साक्षरता कार्यशाळा आयोजित करणे आणि डिजिटल साधनांपर्यंत व्यापाऱ्यांची सुलभता सुधारणे यासारख्या व्यावहारिक शिफारसींसह हा पेपर संपतो. डिजिटल वित्त भारताच्या आर्थिक भविष्याचा आधारस्तंभ बनत असताना, संक्रमणात कोणीही मागे राहू नये याची खात्री करण्यासाठी मोहित खैरनार यांच्यासारखे संशोधन आवश्यक आहे.

## सारनाथ कॉलनी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

सारनाथ कॉलनी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंती सकाळी१० वा. साजरी करण्यात आली. यावेळी सर्व उपासक आणि उपाशीक उपस्थित राहून जयंती उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी सारनाथ कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात करून यावेळी प्रा.रविंद्र शिनगारे यांच्यासह सामूहिक वंदना घेण्यात आली.



पुढे ॲड. ओमप्रकाश गायकवाड, ॲड.जाधव, से.नि. मुख्याध्यापक ज्ञानोबा वाघमारे, अशोक शिनगारे, रानोबा धबाले, जाधव बादल, सह यावेळी विशेष उपस्थिती पत्रकार शेख फहीम शेख सलीम यांच्या समक्ष वरील मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले यावेळी. महाबोधि विहारावरती जे गैर बौद्ध म्हणून भासवत जे वर्षानुवर्ष अतिक्रमण केले आहे. अशा आमच्या पवित्र स्थळाला जे की गौतम बुद्धांना त्या ठिकाणी ज्ञान प्राप्ती झाली असे ठिकाण मुक्त करावे यासाठी स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. यावेळी सारनाथ कॉलनीतील सर्व महिला पुरुष नागरिकांनी सह्या करून आपला निषेध नोंदवला. पुढे सहावीतील मुलीं कु.रितिका वाघमारे व कू.प्रियांसी वाघमारे यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गाण्यावरती नृत्य सादर केले. चि.प्रितेश या बालकाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषणा दिल्या आणि वरील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश सोनवणे सर, शिंदे सर, पप्पू वाघमारे, किरण तुरुकमारे, मंगेश डोळस, राहुल वाघमारे इत्यादींनी सहकार्य केले.

यावेळी सारनाथ कॉलनीतील क्लास वन अधिकारी डॉ. प्रकाश खरात, से.नि. कृषी अधिकारी त्र्यंबक वाघमारे, देविदास वाघमारे परिवार, उनवणे सर, वसंत वाघमारे, अनंत तूरुकमारे, विकास सदाफुले व श्रीमती कमल नामदेव वाघमारे, गायकवाड पदमीनबाई, कलावती शिनगारे, उषा डोळस, सूर्यकांता धबाले, ज्योती तूरुकमारे, सुजाता खरात, सुवर्णा वाघमारे, वंदना वाघमारे, कमल वाघमारे, पल्लवी जोगदंड, रेश्मा शिनगारे परिवार, माया झुंबर मस्के, वाघमारे रेवती, पल्लवी जोगदंड, उषा वाघमारे, वर्षा शिंदे सुनिता सदाफुले इत्यादी सह बाल बालिका उपस्थित होते. कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार दर्शन प्रा.रविंद्र शिनगारे यांनी केले.



बीड : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी युवा नेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## मौजे बोरफडी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

भारतीय संविधानाचे जनक परमपूज्य, महानायक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त मौजे बोरफडी ता जि बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करतांना बोरफडी चे सरपंच कैलास घुगे, उपसरपंच लालासाहेब पन्हाळे, ग्रामपंचायत सदस्य गोरखनाथ घुगे, गोपीनाथ घुगे, नवनाथ कुटे, लालासाहेब घुगे, बाबासाहेब कुटे, सोपान वाघमारे, सोमीनाथ वाघमारे, बबनराव वाघमारे, नवनाथ वाघमारे, ग्रामपंचायत अधिकारी विवेक गित्ते, बिभीषण घुगे, माजी चेअरमन महादेव घुगे, निळकंठ घुगे, सुरेश कुटे, नारायण घुगे, भिमराव घुगे, आश्रुबा घुगे, गोरख घुगे, जयवंत ठोंबरे, नागनाथ घुगे इत्यादींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सरपंच कैलास घुगे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे वर्णन करताना शिक्षण, समता, बंधुता आणि न्याय त्याबरोबर व्यसन मुक्त समाज या त्यांच्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ घुगे यांनी केले तर आभार ग्रामपंचायत अधिकारी विवेक गित्ते यांनी मानले.

## अबॅकस स्पर्धेत राजवीर धनेश्वर खेत्रेचे यश

गेवराई । प्रतिनिधी

स्वराज्य नगर येथील समर्थ अबॅकस अकॅडमीने आयोजित केलेली झोनल लेवल अबॅकस कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या इयत्ता तिसरीच्या वर्गातील चि.राजवीर धनेश्वर खेत्रे याने चॅम्पियन ऑफ द चॅम्पियन होत प्रथम क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. याबद्दल त्याचे सर्वच





स्तरातून कौतुक केले जात आहे. गेवराई तालुक्यातील भेंड खु./सुलतानपूर चे सरपंच धनेश्वर खेत्रे यांचे चिरंजीव राजवीर खेत्रे याने अबॅकस कॉम्पिटिशन स्पर्धेत सहभाग घेवून प्रथम क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन करुन ट्रॉफी मिळवली आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. तर चि.राजवीर ला साक्षी पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशाबद्दल त्याचे सर्वच स्तरातून कौतुक होवून अभिनंदन केले जात आहे.

## पात्र कुटुंबांनी आवास प्लस २०२४ सेल्फ सर्व्हे मोबाईल ॲपद्वारे सर्वे करून घ्यावा : सचिन शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत पात्र कुटुंबाचे आवास प्लस २०२४ मोबाईल -ॲप मध्ये सर्वेक्षणा साठी शासनाकडुन Self Survey पर्याय दिलेला आहे. Self Survey मोबाईल app द्वारे स्वतः पात्र कुटुंब प्रमुख किंवा कुटुंबातील कोणताही सदस्य मोबाईल -ॲपद्वारे आपल्या कुटुंबाचा सर्वे करुण ऑनलाईन माहिती आपलोड करू शकतो.मात्र यामध्ये संबंधीत कुटुंब प्रमुखाने अथवा कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावे यापुर्वी कोणत्याही योजनेतुन घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा



किंवा संबंधीत कुटुंब प्रमुखाचे नाव सन २०१८ च्या सर्वेनुसार प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-१ मध्ये नाव समाविष्ट नसावे. सदरील मोबाईल -pp द्वारे आपल्या कुटुंबाचा घरकुलासाठीचा सर्वे आपण स्वतः दिनांक २५ एप्रिल २०२५ पुर्वी करण्यात यावा. या तारखे नंतर सदरील मोबाईल - ॲप बंद होणार असुन ज्यांनी स्वतः मोबाईल -ॲपद्वारे सर्वे करुण माहिती ऑनलाईन अपलोड केलेली आहे. संबंधीत कुटुंब प्रमुखांनी मोबाईल - ॲपद्वारे भरलेली माहिती खरी असल्याबाबत पडताळणी करण्यासाठी दि. २५ एप्रिल २०२५ नंतर वरीष्ठ कार्यालयाचे अधिकारी अशा कुटुंबांना भेट देण्यासाठी येणार आहे तरी सर्वांनी सदरील घरकूल सर्वेक्षण मोबाईल -ॲमध्ये सत्य माहिती भरून सर्वे करून घ्यावा असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे.

## अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी

नवी दिल्ली । प्रतिनिधी

अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. तशा आशयाचा एक ई मेल अयोध्या राम मंदिर ट्रस्ट आणि उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांच्या डीएमना आला आहे. सोमवारी रात्री हा धमकीचा ई मेल आला होता. या प्रकरणी अयोध्येच्या सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. हा ई मेल तामिळनाडूतून आल्याची माहिती आहे.

सोमवारी रात्री रामजन्मभूमी ट्रस्टच्या मेलवर धमकीचा मेल आला होता. 'मंदिराची सुरक्षा वाढवा' असं त्यामध्ये लिहिण्यात आलं होतं. धमकीचा मेल मिळाल्यानंतर व्यापक शोध मोहीम सुरू करण्यात आली. राम मंदिर ट्रस्टने एफआयआर दाखल केला आहे.

### धमकीचा मेल तामिळनाडूतून

अयोध्येसोबतच बाराबंकी आणि चंदौलीसह इतर अनेक जिल्ह्यांनाही धमकीचे मेल आले आहेत. बाराबंकी आणि चंदौलीच्या डीएमला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ईमेल आला आहे. अयोध्या आणि इतर जिल्ह्यांना पाठवलेला धमकीचा मेल हा तामिळनाडूतून आला असल्याची माहिती आहे. एफआयआर दाखल केल्यानंतर सायबर सेल पाठवलेल्या ईमेलची चौकशी करत आहे

### देशभरातील सुरक्षा यंत्रणा अलर्ट

मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाला अमेरिकेतून भारतात आणल्यानंतर देशभरातील सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत. या प्रकरणी गुप्तचर यंत्रणांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. त्यातच आता अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे.

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण चौक अंबाजोगाई येथे सर्वपक्षीयांच्या वतीने विविध उपक्रम राबवून अभिवादन

अंबेजोगाई । प्रतिनिधी

शहरात दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंतीनिमित्त अंबेजोगाई शहरातील यशवंतराव चौक येथे जयंतीचे अध्यक्ष सूरज भैया तेरकर वा आयोजक राजेश भाऊ वाहुळे मार्गदर्शक भीमराव सरवदे साहेब यांनी आयोजित केलेल्या कार्क्रमात प्रथम अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुल येथे झेंडावंदन करण्यात आले त्यानंतर यशवंतराव चव्हाण चौक येथे डॉ बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले तसेच भीम गीतांचा कार्यक्रम शाहीर व त्यांची टीम तसेच जयंतीला आलेल्या सर्वांसाठी जेवणाचा कार्यक्रम करून जयंती मोठ्या उत्साहाने जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी आमदार राष्ट्रवादी शरद पवर गटाचे



*पृथ्वीराजजी साठे साहेब शेळी मेंढी महामंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब दोडतले साहेब चंद्रशेखर वडमरे साहेब शोभाताई सुनील काका लोमटे नगरसेवक संतोष दादा शिनगारे नगरसेवक दिनेश भाऊ भराडीया नगरसेवक संजय भैय्या गंभीरे नगरसेवक वाजिद भाई खतीब नगरसेवक तथा काँग्रेसचे अंबाजोगाई शहराध्यक्ष खतीब बाबा वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा अध्यक्ष शैलेश भैय्या कांबळे पीएसआय रोडे साहेब ए एस आय बाळासाहेब रोडे साहेब गोविंद भाऊ मस्के निखिल भैय्या पाडुळे पप्पू भैया आपेट प्रकाशजी बोरगावकर सर कृष्णा सुनील काका लोमटे लोक जनशक्ती पार्टी चे *राजेश भाऊ वाहुळे प्रहार संघटनेचे *जहांगीर मीर खान पठाण,शेख रमिज सर जिल्हा परिषद सदस्य शंकर अण्णा उबाळे माजी सरपंच कचरे साहेब भैय्या लोमटे सर,मराठा महासंघाचे *राणा चव्हाण *महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे *सुनील भाऊ जगताप डॉ मस्के सर शिवसंग्राम चे धनेश भैय्या गोरे युवा नेते सचिन भाऊ देवकर जमील जहागीरदार(बाब्र्या भाई) अभिजीत भैय्या लोमटे सरपंच उगले साहेब सरपंच बाळासाहेब केंद्रे सरपंच औदुंबर भैय्या मोरे बापूसाहेब घाडगे जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब शेप पोतांगळे साहेब अमोल भैया पोळे साहेब फकीरा ब्रिगेड अविनाश भाऊ लोंढे,गोलू भैय्या लोमटे भाजपचे अमित भैया जाजू पत्रकार शेख जमीर भाई सतीश भाऊ शिरसगर ॲड कातखडे साहेब भाजप नेते हुसेन शाहा साहेब सामजिक कार्यकर्ते ,सुधाकरजी जोगदंड लोकजाणीशक्ती पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक भैया काळे विशाल शेवाळे प्रदीप गुंड्रे धम्मा वाघमारे युवानेते पंकज भैया मस्के धीमानत राष्ट्रपाल रत्नदीप बनसोडे पत्रकार शेख फिरोज आदित्य चौरे व *समितीचे अशोक बनसोडे*बालू सचिन भैय्या बनसोडे भाऊ मुळे,बंटी गायकवाड, सिद्धेश जाधव, जितेश जाधव,विलास कसबे जोतिर्लिंग जोगदंड ,अक्षय पाटोळे ,कैलास मस्के, अरुण धायगुडे आणि सर्वपक्षीय मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड शहर बचाव मंच जनसुरक्षा कायद्याविरुद्ध रस्त्यावर उतरणार : नितीन जायभाये

## समविचारी भुमिका आणणाऱ्या संघटना व राजकीय पक्षांसोबत करणार आंदोलन

बीड । प्रतिनिधी
महाराष्ट्र शासनाने जनसुरक्षा विधेयक क्र.३३ आणले आहे. हे विधेयक म्हणजे संविधानाने नागरिकांना परिच्छेद १९ नुसार दिलेल्या अधिकारांवर थेट हल्ला करणारे आहे. याचे नाव जरी जनसुरक्षा विधेयक असले तरी हे शासन सुरक्षा विधेयक आहे हे कुणीही सुज्ञ व्यक्ती हा कायदा वाचून सहज सांगू शकेल. हा कायदा नक्षलवादी किंवा अर्बन नक्षलवादी यांच्याकरिता बनवत आहोत असे जरी शासन सांगत असले तरी या संपूर्ण विधेयकामध्ये नक्षलवाद किंवा अर्बन नक्षलवाद हा शब्दसुद्धा नाही. या विधेयकातील सर्वात महत्वाची आणि हरकत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या विधेयकाच्या सुरुवातीला आणि संपूर्ण विधेयकात वारंवार बेकायदेशीर कृत्य असा एक शब्द आहे. परंतु या बेकायदेशीर शब्दाची सविस्तर व्याख्या केली गेलेली नाही. बेकायदेशीर कृत्य कोण ठरवणार? तर शासन ठरवणार. मग बेकायदेशीर कृत्य म्हणजे शासनाला जे कृत्य बेकायदेशीर वाटेल ते कृत्य असाच त्याचा सरळ अर्थ होतो. म्हणजे सरकारच्या धोरणांच्या/ योजनांच्या/ निर्णयांच्या विरोधात जी कुणी व्यक्ती भाष्य करेल, लिखाण करेल, किंवा संवैधानिक मार्गाने निषेध करेल त्यांच्या कृत्यालाही महाराष्ट्र शासन बेकायदेशीर कृत्य ठरवू शकते. तसेच शासन ज्या विचारांचे आहे त्या विचारांच्या विरोधी विचारांच्या व्यक्ती/ संघटनांना सुद्धा हे शासन बेकायदेशीर ठरवू शकते हे सत्य नाकारता येत नाही. आमच्या योजना/धोरणे/ निर्णय चुकीचे असूच शकत नाहीत अशीच





कुठल्याही शासनाची भूमिका असणार आहेच. पण जर नागरिकांना त्या गोष्टी पटल्या नाहीत तर त्यांना त्याविरोधात बोलूही नये अशी भूमिकाच संविधानविरोधी आहे. त्यामुळे सर्वप्रथम बेकायदेशीर कृत्य म्हणजे कोणकोणते कृत्य हे अगदी स्पष्टपणे शासनाने जाहीर करणे गरजेचे होते पण शासनाने बेकायदेशीर शब्दाची व्याख्या अतिशय गुढपणे केली आहे.
हे विधेयक केवळ संशयाच्या आधारावर अनुच्छेद १९ मध्ये असलेल्या मूलभूत अधिकारांचे हनन करणारा ठरणार आहे. प्रस्तावित अधिनियमामध्ये एखादे बेकायदेशीर कृत्य करण्याकडे ज्याचा कल आहे अशा व्यक्ती/संघटनांवर हा कायदा लागू होईल असे नमूद केलेले आहे याचाच अर्थ एखादी संघटना/ व्यक्ती यांच्या बद्दल त्यांच्या कृत्याबद्दल कुठली शहानिशा न करता हे बेकायदेशीर कृत्य घडू शकते असे संशयाच्या आधारे गृहीत धरून या कायद्यानुसार सरकार कारवाई करण्यास प्रारंभ करेल. म्हणजेच कोणतीच कृती न घडताही सरकारला वाटल्यास/संशय असल्यास त्या संस्था/व्यक्तीवर कारवाई होणार आहे. कोणतीही फौजदारी कारवाई गैर कायदेशीर कृत्य घडल्यानंतरच सुरू होत असते परंतु प्रस्तुत कायदा बेकायदेशीर कृत्य घडण्यापूर्वीच केवळ संशयाच्या आधारावर कारवाई करणार आहे. एकूणच हा कायदा ज्या कोणत्या संघटना/व्यक्ती जर सरकारच्या धोरणांवर/निर्णयावर टीका करणार असतील, विरोध करणार असतील तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो ही बाब पुढे करून त्या त्या संघटनांवर व्यक्तींवर कारवाई करणार आहेत हे स्पष्ट दिसते.
या विधेयकाचा मूळ उद्देश शासनाला कुणीही विरोधकच राहू नये हा स्पष्टपणे दिसतो. म्हणजे उद्या विरोधी पक्ष निवडणुकांमध्ये सरकारच्या विरोधात प्रचारही करू शकणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण होईल. जी की लोकशाहीला अत्यंत मारक आहे. या विधेयकाचे जर कायद्यात रूपांतर झाले तर यापुढे या राज्यात शासनाने कोणतेही कायदे/ योजना आणल्या त्या नागरिकांसाठी अन्यायकारक असल्या तरीसुद्धा त्याला विरोध करण्याचा नागरिकांचा हक्कच पूर्णपणे काढून घेतला जाणार आहे.

# प्रकाश आंबेडकर नगरात ध्वजारोहण



बीड । प्रतिनिधी
संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रकाश आंबेडकर नगर मधील बुद्ध विहारात पंचध्वजाचे ध्वजारोहण नगरसेवक संजय उडान यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर जयंती कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बार्शी नाका परिसरात असलेल्या प्रकाश आंबेडकर नगरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक उपक्रमाबरोबरच ध्वजारोहण बुद्ध वंदना, जयंती मिरवणूक अशा कार्यक्रमाचे आयोजन आयोजकांनी केले होते. जयंती कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध विहारा समोर पंचध्वजाचे ध्वजारोहण नगरसेवक संजय उडाणे यांच्या हस्ते करून जयंती कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला अशोक वीर, डॉक्टर वाघमारे, अभिषेक डोंगरे, संतोष भोले, कामेश धनवे, कुंदन जोगदंड, मयूर वीर, बबलू ओव्हाळ, शहादेव वंजारे सह परिसरातील भीमप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




जातेगाव : मौज ठाकर आडगाव ग्रामपंचायत कार्यालय व जि.प.प्रा. शाळा येथे भीम जयंतीनिमित्त माहामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित सरपंच भागवत जाधव, उपसरपंच लक्ष्मण कोकाट, चेअरमन संदिप कोकाट, मुख्याध्यापक पवार सर, गोसावी सर, शालेय अध्यक्ष अंकुश सोनवणे, शालेय उपाध्यक्ष महेश कोकाट, पत्रकार बाबू कोकाट, पत्रकार आकाश सोनवणे, महेश पटेकर, दादा घोडेराव, साळीकराम चव्हाण, सोमनाथ पांढरे, शिवाजी कोकाट, सिताराम खरात आदी उपस्थित होते.



चौसाळा: चौसाळा येथील भीमनगर मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी चौसाळा शहरातील सरपंच, माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार यांच्यासह इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगणी खुर्द येथे शेतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी

चौसाळा । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथे शेतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व शेतकऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प करून



अभिवादन करण्यात आले.
यावेळी येथील शेतात ऊस लागवड सुरू असताना शेतातच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेमी नागरिक यांनी शेतातच जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी सुनील गायकवाड, रामभाऊ गायकवाड, पप्पु आंधळे, विठ्ठल तांदळे, राम तांदळे, चंद्रकांत नागरगोजे, संदीप नागरगोजे, अमोल तांदळे, यांच्यासह महिला उपस्थित होत्या. यावेळी प्रतिमा पु जन करून अभिवादन केल्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने घोषणा देत जयंती आगळ्या वेगळ्या पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



# सिरसाळ्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरात वर्दीतला देव माणूस दिसला

सिरसाळा । प्रतिनिधी
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मोजे सिरसाळा या ठिकाणी रक्तदान शिबिर व सामाजिक उपक्रम राबवले जातात. यामध्ये खास करून रक्तदान शिबिराला नागरिकांचा फुल प्रतिसाद दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३६ भीमसैनिकांनी यावेळी रक्तदान करण्यात आले. यामध्येच एक वर्दी मधला देव माणूस दिसला. सिरसाळा पोलीस ठाण्यातील पीएसआय आनंद जाधव यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. त्यासाठी त्यांनी रक्तदान केले व सर्व रक्तदान करणाऱ्या भीमसैनिकांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.
या शिबिराला एसआरटी महाविद्यालय अंबाजोगाई डॉ.संच उपस्थित होता. सर्वांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रक्तदान करते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. झुंजुर्डे, बनसोडे, चेअरमन तुकाराम आचार्य, उमेश किरवले, डॉ.उजगरे, अमोल किरवले, राज किरवले, अतुल आरसुळे, युवराज किरवले, करण बनसोडे, आनंद किरवले यांनी डॉ.आंबेडकर जयंती निमित्त ठेवलेल्या रक्तदान शिबिरास यांनी रक्तदान करण्यात आले. नंतर खीर खिचडीचे सर्व भीमसैनिकांना भोजन देण्यात आले. जयंती कमिटी सिरसाळा यांच्या सौजन्याने सर्व कार्यक्रम राबवले जातात. यामध्ये उपासक उपासिका बालक बालिका उपस्थित होते.

# बलभीम नगर बुद्धविहार, शिवाजीनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

बीड । प्रतिनिधी
बलभीम नगर लेझिम पथकाने सर्वांचे मन जिंकले. त्यावेळी ड तेजस वडमारे, सिद्धार्थ वडमारे, नागेश साळवे, आर्यन साळवे गौतम खेमाडे, सचिन वाघमारे, राधाताई साळवे, अंजली तेजस वडमारे, अंजली वडमारे, सरिता खेमाडे, सुजाता वाघमारे, कोमल वाघमारे, आचल वडमारे, प्रीती जाधव, आरोही अंकुटे, अदिती धनवे, सांची वडमारे, जानवी वाघमारे, पंचफुला वाघमारे, वर्षा खेमाडे, शालन धनवे, उर्मिला वडमारे, जयश्री वडमारे, स्वाती वडमारे, सोनाली अंकुटे, सुशीला साळवे, हेमा वडमारे, रमा सोनवणे, दिपाली जाधव, जयश्री गवळी, अर्चना जाधव विशाल वडमारे, राजू धनवे, सचिन खेमाडे, नितीन वाघमारे, शिला साळवे, राणी




साळवे, अनन्या वाघमारे, संगीता जाधव, रोहन जाधव, आदित्य खेमाडे, भाऊसाहेब भोसले, दिलीप गवळी, प्रकाश शेंडगे, लक्ष्मण भंडारे व शिवाजीनगर, बलभीम नगर, दिलीप नगर, मित्र नगर परिसरातील सर्व उपासक, उपासिका, बालक, बालिका उपस्थित होते.

# शिक्षक मोहन झगडे यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक लोकरत्न' पुरस्कार जाहीर

## समाजसेवेतील कार्याची राज्यस्तरीय पातळीवर दखल, विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव..!

बीड । प्रतिनिधी
आष्टी तालुक्यातील सोलेवाडी गावाचे सुपुत्र व ब्रह्मगाव येथील श्रृंगेरी विद्यालयाचे सहशिक्षक श्री.झगडे मोहन महादेव यांना त्यांच्या समाजोपयोगी कार्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक 'लोकरत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिरात वितरित करण्यात येणार असून, राजस्थानचे महामहीम राज्यपाल श्री हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल. मोहन झगडे सरांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य बी ए एसी., बी.एड. शिक्षण घेतलेले झगडे सर सध्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रृंगेरी विद्यालय, ब्रह्मगाव येथे कार्यरत असून, मागील १७ वर्षांपासून ते विनामोबदला सेवा केली. आणि आता वेतन चालू आहे.
स्वच्छता, वेळेचे महत्त्व, शिस्त आणि बंधुता या मूल्यांचा प्रचार–प्रसार ते शाळकरी विद्यार्थ्यांत सातत्याने करत



आहेत. त्यांच्या कार्यामध्ये खालील बाबी विशेष उल्लेखनीय ठरतात. सिंधुताई सपकाळ बचत गटामार्फत अनाथ व गरजूंसाठी दरमहा आर्थिक मदत गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिकवणी व बससुविधा सामाजिक, आध्यात्मिक व आरोग्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत व्यसनमुक्ती व पर्यावरणस्नेही उपक्रमांचे आयोजन कोरोनाकाळात गरजूंसाठी जीवनावश्यक मदत विद्यार्थ्यांची फी भरून प्रवेश मिळवून देणे कविता, भावगीत लेखन व सादरीकरण गावविकासाच्या कामांमध्ये सक्रीय सहभाग पुरस्कार सोहळयाला मान्यवरांची उपस्थिती राजस्थानचे महामहीम राज्यपाल श्री.हरिभाऊ बागडे यांच्यासोबत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, कॅबिनेट मंत्री अतुल सावे, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पालकमंत्री खासदार संदीपान भुमरे, माजी खासदार इम्तियाज जलील, आमदार प्रदीप जैस्वाल, संदीप क्षीरसागर, प्रशांत बंब तसेच राष्ट्रसंत रामगिरीजी महाराज आणि मराठवाड्यातील अनेक मान्यवर आय ए एस/आय पी एस अधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे. पुरस्कार प्रदान करताना लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याचे बी.बी.वैद्य, प्रदेश सहसचिव सुनील महाकुंडे, उपाध्यक्ष अनीस कुरेशी, बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे आदी मान्यवर उपस्थित राहतील. समाजात नवा आदर्श श्री.झगडे सरांचे कार्य समाजात नवा प्रकाश पसरवणारे असून, त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांचा गौरव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल सोलेवाडी, बावी ग्रामस्थांच्या वतीने आणि पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी, आजी माजी सैनिक त्रिदल संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच आजी–माजी आमदार, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नातेवाईक, मित्र परिवार व सर्व क्षेत्रातील मान्यवरांकडून सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाज सेवा हिच खरी ईश्वर सेवा या तत्त्वाला त्यांनी खरी उतराई केली असून, असे शिक्षक तरुण पिढीला प्रेरणा देणारे आहेत.

# सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाल चिखल आक्रोश आंदोलन

## शेतीमालाला भाव नाही, उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी

बीड । प्रतिनिधी

दुष्काळ, अवकाळी पाऊस नापिकी या अस्मानी संकटासोबतच शेतीमालाला भाव नसणे, सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या सुलतानी संकटाचा सामना करावा लागत असुन शेतीमालाला हमीभाव नसुन उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी असुन सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी एका एकरात तब्बल दीड लाख रुपये खर्च करून आलेलं टोमॅटो पिक विक्रीसाठी परवडत नसल्याने झाडावरचं शेतात खराब होऊ लागले आहे. त्यांना नुकसान भरपाई मिळावी आणि शेतकऱ्यांप्रती वारंवार असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१५ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात टोमॅटो तुडवत लक्ष्यवेधी लाल चिखल आक्रोश आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक ढास, शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, प्रदीप औसरमल, गौतम कोरडे, आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे आदी सहभागी होते.



अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करत शेतकरी शेती करतो. त्यातही वाढलेल्या खत बियाणे, युरीया आणि फवारणीच्या औषधांच्या वाढत्या किंमती, मजुरीच्या दरात वाढ, वाहतुकीचा खर्च करून पिकविलेल्या मालाला कमी भावात बाजारात विकावे लागते. नाईलाजाने शेतकऱ्यांना कमी किंमतीत शेतमाल विकुन आर्थिक नुकसान सहन करावे लागते. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचा सामना करण्याची वेळ आली आहे. सरकारच्या धोरणांमुळे शेतीमालाला भाव मिळत नसुन शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन नापिकीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. यातुन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल शेतकरी उचलत आहेत. शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. सरकारची ऊदासीनता याला जबाबदार असुन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे मुश्किल झाले आहे. सरकारचे आर्थिक धोरण शेतकऱ्यांना मारक ठरत आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

### मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक ढास आंदोलनात सहभागी

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी तब्बल दिड लाख रुपये खर्चून टोमॅटोचे पिक आणले. मात्र विक्रीसाठी परवडत नसल्याने टोमॅटो शेतातच झाडावर पिकुन गळु लागले आहेत. त्यांच्या शेतातील २०० किलो टोमॅटो लाल चिखल आक्रोश आंदोलनासाठी वापरण्यात आले असुन अशोक ढास आंदोलनात सहभागी होते.

### शेतकऱ्यांप्रती असंवेदनशील कृषीमंत्री कोकाटे यांची मंत्रीपदावरुन हकालपट्टी करा

अस्मानी आणि सुलतानी संकटांनी आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांप्रती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे पिक विमा प्रकरणी भिकाऱ्याशी शेतकऱ्यांची तुलना करतात तर कधी शेतकरी कर्जमाफीचा पैसा शेतीत न गुंतवता साखरपुडा आणि लग्नावर खर्च करतात तर कधी शेतकरी जास्त उत्पादन करत असल्याने शेतमालाला भाव नाही असे वारंवार असंवेदनशील वक्तव्य करत असुन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी त्यांना याबाबत समज द्यावी आणि त्यांच्यात सुधारणा होत नसेल तर त्यांना कृषीमंत्री पदावरून हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# निर्भीड पत्रकार संघाची गेवराई तालुका कार्यकरणी जाहीर

## तालुका अध्यक्षपदी अमोल कापसे यांची सहाव्यांदा बिनविरोध निवड तर सचिवपदी बाळासाहेब घाडगे यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

निर्भीड पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची गेवराई तालुका कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. निर्भीड पत्रकार संघाच्या संस्थापक अध्यक्षा रुचिता मलबारी यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढाका यांच्या शिफारशी वरून गेवराई तालुका कार्यकारणी ची निवड करण्यात आली. यावेळी गेवराई तालुका अध्यक्षपदी अमोल कापसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली अमोल कापसे यांची सलग पहिल्यांदा तालुका अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. तर तालुका सचिव पदी बाळासाहेब घाडगे यांची निवड करण्यात आली. या कार्यकारणी मध्ये शहराध्यक्षपदी सतीश वाघमारे यांची सलग दुसऱ्यांदा निवड करण्यात आली. यावेळी तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते.



यावेळी तालुका अध्यक्षपदी अमोल कापसे, तालुका उपाध्यक्षपदी असलम कादरी तालुका सचिव पदी बाळासाहेब घाडगे, तालुका कोषाध्यक्षपदी औदुंबर खेडकर, तालुका कार्याध्यक्षपदी अशोक मोरे, तालुका संघटक पदी, प्रवीण कुलथे तालुका प्रसिद्धी प्रमुख पदी सय्यद गफ्फार तर शहराध्यक्षपदी सतीश वाघमारे शहरउपाध्यक्षपदी शुभम घोडके, शहर सचिवपदी गजानन संभाहारे तर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. पवन लाहोटी, यांची निवड करण्यात आली तर मार्गदर्शक म्हणून जेष्ठ पत्रकार, खदिर बागवान यांची निवड करण्यात आली. तर कार्यकारणी च्या सदस्यपदी अंगद गावडे, उस्मान शेख, समीर शेख, प्रदीप गाजरे, भाऊसाहेब महानोर, खदिर बागवान यांची निवड करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्ष अमोल कापसे यांनी पत्रकार संघाच्या गेल्या पाच वर्षाचा आढावा सादर करत यापुढे देखील निर्भीड पत्रकार संघ सर्वसामान्यांच्या न्यायासाठी व हक्कासाठी कायम कार्य करत राहणार असून नागरिकांच्या समस्या शासन दरबारी मांडून त्यांना न्याय देणासाठी निर्भीड पत्रकार संघ सदैव प्रयत्नशील राहिल असे मत व्यक्त मनोगत निर्भीड पत्रकार संघांचे तालुका अध्यक्ष अमोल कापसे यांनी व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने निर्भीड पत्रकार संघातील पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते.

# पांढरवाडी फाटा येथे शॉर्टसर्किट होऊन कार डेकोरच्या दुकानाला आग

## जवळपास विस लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज

गेवराई । प्रतिनिधी

देवांश कार डेकोरच्या दुकानाला अचानक लाग लागल्याची घटना रविवारी मध्यरात्रीनंतर गेवराई शहरातील पांढरवाडी फाटा येथे घडली. दरम्यान, सदरील आग शॉर्टसर्किट होऊन दुकानाला आग लागली असल्याची माहीती असून, या आगीत दुकानातील साहीत्य जळुन खाक झाल्याने साधारण विस लाखांचे नुकसान झाले आहे. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत पांढरवाडी फाट्यावर खळेगाव (ता. गेवराई, जि. बीड) येथील योगेश भारत शिंदे यांचे देवांश कार डेकोरचे दुकान आहे. रविवार (दि.१३) मध्यरात्रीनंतर या दुकानाला अचानक शॉर्टसर्किट होऊन आग लागली.






या आगीत दुकानातील महागडी साऊंड सिस्टीम, इन्टेरिअम सिस्टम, कॅमेरे, चारचाकी वाहनास लागणारे किंमती साहीत्य जळुन खाक झाले. या दुकानाला आग लागल्याची माहीती उशिरा समजल्यावर आग्निशामक बंबाने आग विझवली. या आगीत जवळपास विस लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, महसूल, पोलीस प्रशासन तसेच महावितरणच्या आधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

दरम्यान, दुकानाला आग लागल्याचे कळताच दुकानाचे मालक योगेश शिंदे यांना मानसिक धक्का बसल्याने त्यांना गेवराईतील एका खासगी रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले असून, राष्ट्रवादीचे माजी आमदार अमरसिंह पंडित, दिपक आतकरे, शिवसेनेचे यशराज पंडित यांनी भेट देऊन योगेश शिंदे यांना धीर दिला.



# बीडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व रामनवमीनिमित्त मुस्लिम समाजातर्फे पाण्याचे वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात गेल्या काही वर्षांपासून सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सौहार्द जपण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर बीड नगरपरिषदेचे माजी सभापती व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी रामनवमी दिवशी आणि आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने मुस्लिम समाजातर्फे पिण्याचे पाण्याचे वाटप केले.

सन २०१४ पासून दरवर्षी विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये पाण्याचे वाटप करत आलेल्या खुर्शीद आलम यांनी यंदाही दि.६/०४/२०२५ रोजी रामनवमीच्या दिवशी आणि आज १४ एप्रिल २०२५ रोजी बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बाबासाहेबांच्या अनुयायांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले होते. या उपक्रमात शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांच्यासोबत अनीस भाई, राजु भाई, बबलु भाई, खालेद भाई, कलीम भाई, अझहर भाई, लतिफ पठाण, मोहम्मद शहेबाज, साजेद भाई, रफिक भाई, मुजीब भाई, बब्बर भाई, यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. विविध समाजांमध्ये ऐक्य आणि बंधुत्व निर्माण व्हावे या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सतत जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्नशील असलेले खुर्शीद आलम आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा हा उपक्रम सामाजिक एकतेचा आदर्श ठरत असुन सर्व समाजाच्या वतीने कौतुक होत आहेत.

# गॅसच्या दरवाढीमुळे महिलांना चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ

## सर्वसामान्यांना गॅस परवडेना सबसिडी बंद : सविता सोपान मोरे

शिरूर कासार । प्रतिनिधी

पूर्वी गॅस सिलेंडर माफक दरात मिळत असल्याने ग्रामीण क्षेत्रातील गरिबांना देखील ते परवडणारे होते परंतु घरगुती गॅस सिलेंडरची सतत दरवाढ होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब जनता महागाईने त्रस्त झाली आहे. गॅस सिलेंडरचे वाढते दर सर्वसामान्यांना पेलवत नसल्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना उन्हातान्हात शेतात वन वन करत जाळण्यासाठी सरपण मिळवण्यासाठी शोधाशोध करावी लागत आहे. सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ होत असल्याने गोरगरिबांचे पंचायत झाली. त्याचबरोबर गॅसची सबसिडी पण बंद झाल्यामुळे ग्रामीण भागातील महिला पुन्हा चुलीकडे वळत आहेत.

घरगुती गॅस सिलेंडरची किंमत ९०० रुपयावर पोहोचली असून त्यात अतिरिक्त गाडी भाडे द्यावे लागत आहे. ग्रामीण भागातील हातावर पोट असणाऱ्या सर्वसामान्य गरिबांना कष्टकरी महिलांना या सिलेंडर परवडत नसल्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून पुन्हा चुलीकडेवळलेले दिसून येत आहे. उसाची खोडवे सेनाच्या गवऱ्या झाडांच्या वाळलेल्या फांद्या तोडून त्या सरपणाचा ढीग लावून ठेवण्यामध्ये महिला वर्ग मग्न आहे. चौपदरी महामार्गाची कामे सुरू झाल्याने झाडांचे काढून टाकण्यात आलेली बुंदे आणि फांद्या गोळा करण्याची लगबग सध्या सुरू आहे. जनावरांचे सेन साठवून ठेवून त्याच सेनाच्या गवऱ्याचा ढीग थापून वाळवून ठेवण्याकडे देखील महिला विशेष लक्ष देत आहेत. गॅस सिलेंडर घेणे परवडत नसल्यामुळे ग्रामीण भागातील जनता पुन्हा चुलींचा आधार घेत आहे. सरपनासाठी महिला जंगलात माळराणावर वन वन भटकंती करत असल्याचे चित्र शिरूर कासार तालुक्यातील ग्रामीण भागात विशेष वाडी वस्ती तांड्यावरील दुर्गम खेड्यापाड्यात पाहायला मिळत आहेत जर ही गॅस दरवाढ यात्या आठ-दहा दिवसात कमी नाही झाली तर शिरूर तालुक्यातील सर्व गोरगरीब महिलांना सोबत घेऊन तहसीलवर धडक मोर्चा शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने करण्यात येईल.



### शिधापत्रिकेवर मिळणारे रॉकेल ही गायब

स्वस्त धान्य दुकानातून धान्य राकेल ही मिळत होते परंतु गॅसचा लाभ घेतल्यामुळे दुकानातून मिळणारे रॉकेल बंद झाले त्यामुळे महिला गवऱ्या व सरपनाकडे पुन्हा वळाले आहेत शंभर रुपयात उज्वल गॅसची जोडणी मिळत असल्याने सुरुवातीच्या काळात या योजनेला उत्तम प्रतिसाद ही मिळाला परंतु सिलेंडरच्या किमती दरवाढ आवाक्याबाहेर गेल्याने आपली चुलच बरी अशी भावना गरीब कुटुंबातील महिलांची झाली आहे.

### पैसे नसल्याने सिलेंडर घ्यायचे कसे

उज्वल योजनेतून गरीब कुटुंबांना गॅस सिलेंडर आणि शेगडी सरकारकडून मिळाली परंतु ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांना एकदा संपलेल्या सिलेंडर पुन्हा घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांना ते रिफील करता येत नाहीत त्यातही सबसिडी बंद झाली आहे त्यामुळे उज्वल योजनेचे मूळ उद्देश बाजूला पडला आहे. दिवसेंदिवस गॅसच्या दरात वाढ होत आहे ती परवडणारी नसल्याने व चुलीवर स्वयंपाक करण्याची सवय असल्याने मी चुलीचा वापर सुरू केला आहे.

**– सविता सोपान मोरे उखळवाडी**
ग्रुप ग्रामपंचायत जाटनांदुर
शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे महिला आघाडी

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT